मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दिनांक १० सप्टेंबर २०२५ । पान १

# महापालिकेच्या प्रारूप प्रभागरचनेवरील हरकतींवर आज सुनावणी!

## चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात हरकतींवर सुनावणी

**पिंपरी चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप प्रभागरचनेवर आलेल्या ३१८ हरकतींवर सुनावणी घेण्यात येणार आहे. चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात बुधवारी (१० रोजी) एकाच दिवशी सुनावणी घेतली जाणार आहे. राज्याचे सहकार आणि विपणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे या हरकतींवर सुनावणी घेणार आहेत.



महापालिकेने २२ ऑगस्टला चार सदस्यीय पद्धतीने ३२ प्रभागांची प्रारूप रचना जाहिर केली. प्रारूप प्रभागरचनेचे नकाशे प्रसिद्ध केले आहेत. या प्रभागरचनेवर १४ दिवसांत एकूण ३१८ हरकती आल्या आहेत. यामध्ये मोरवाडी, शाहूनगर, संभाजीनगर या प्रभागाच्या रचनेवर सर्वाधिक ११५, प्रभाग क्रमांक १ चिखली गावठाण, मोरेवस्ती या प्रभागाबाबत ९८ आणि महेशनगर, संत तुकारामनगर व वल्लभनगर प्रभागाबाबत ३१ हरकती आल्या आहेत. प्रभाग क्रमांक ५, १३, १५, १६, १७, १८, २५, २७ आणि २८ या प्रभागांच्या रचनेबाबत एकही हरकत आली नाही. हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी सहकार आणि विपणन विभागाचे प्रधान प्रवीण दराडे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांच्यासमोर बुधवारी दुपारी एक ते चार या वेळेत ३१८ हरकती आणि सूचनांवर सुनावणी घेतली जाणार आहे.

प्रभाग क्रमांक १, २, ११, १२मधील हरकतींवर दुपारी एक वाजता, प्रभाग क्रमांक ३, ४, ६, ७, ८, ९, २०, ३० मधील हरकतींवर दोन वाजता, प्रभाग क्रमांक १०, ११ मधील हरकतींवर तीन वाजता आणि प्रभाग क्रमांक १४, १९, २१, २२, २३, २४, २६, २९, ३१, ३२मधील हरकतींवर दुपारी चार वाजता सुनावणी होणार आहे. हरकत घेणाऱ्या नागरिकाला हरकत दाखल केल्याची पोहोच, सुनावणी नोटीसची प्रत, ओळखपत्रासह प्रत्यक्ष सुनावणीसाठी उपस्थित राहावे लागणार आहे. त्यासाठी सूचनापत्र पाठविले आहे. किती हरकती स्वीकारायच्या, स्वीकारायच्या की नाहीत, प्रारूप रचनेत बदल करायचा की नाही, याचा अहवाल प्राधिकृत अधिकारी दराडे देतील. त्यानंतर अंतिम प्रभागरचनेचा आराखडा तयार करून राज्य शासनाला पाठविला जाणार आहे. त्यानंतर तीन ते सहा ऑक्टोबर दरम्यान अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध केली जाणार असल्याची माहिती महापालिका निवडणूक विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी दिली

# प्रथमोपचारासह सीपीआर प्रशिक्षण अन जनजागृती

**मोशी ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

गणेशोत्सवाच्या निमित्ताने नागरिकांमध्ये प्रथमोपचारासह सीपीआर (हृदयविकारा दरम्यान) चे प्रशिक्षण अनब जनजागृती करण्यात आली. मोशीतील विठ्ठल हॉस्पिटच्या कर्मचाऱ्यांनी नाटीकेच्या सादरीकरणातून जनजागृती केली.

सध्या तरूणांमध्येही हृदयविकाराच्या झटक्याचे प्रमाण वाढले आहे. मात्र अशा अपत्कालीन परिस्थितीमध्ये प्रथमोपचारासह सीपीआर ची माहिती असेल तरून रूग्णाचे जीव वाचविण्यास मदत होते. यासाठी कंपन्यांमध्ये शाळा-कॉलेजमध्ये सीपीआरच्या प्रशिक्षणासह जनजागृती करण्यात येत आहे. यामध्ये तरूणांना मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण देणे आवश्यक असल्याने त्या पध्दतीने कामकाज सुरु आहे.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने समाजाच्या आरोग्यासाठी विठ्ठल हॉस्पिटलने एक पाऊल पुढे येऊन सत्कार्य सुरु केले आहे. रूग्णसेवे सोबतच समाजामध्ये काही गोष्टींवर जनजागृती,



प्रशिक्षण देणे आवश्यक असून, त्यासाठी विठ्ठल हॉस्पिटचा नेहमी पुढाकार असेल असे मत विठ्ठल हॉस्पिटलच्या संचालिका एम.डी.मेडीसीन डॉ. भाग्यश्री लहाने- मुंढे आणि संचालक किडनीतज्ज्ञ डॉ. शंकर मुंढे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी विठ्ठल हॉस्पिटलचे तानाजी मुंढे, अस्थिरोगतज्ज्ञ गणेश मुंढे, रेडिओलॉजिस्ट स्वप्नजा सानप-मुंढे यांच्यासह उद्योजिका शैला मोळक, सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार, स्वप्निल बोऱ्हाडे, उद्योजक संतोष तापकीर, रामदास काळजे यांच्यासह इतर डॉक्टर, नागरिक उपस्थित होते.

सीपीआर बद्दल भारतामध्ये एक टक्के लोकांना माहिती आहे. उर्वरीत लोक यापासून अनभिज्ञ आहेत. सीपीआर ही एक आपत्कालीन जीवन वाचवणारी प्रक्रिया आहे जी हृदयविकारामुळे किंवा श्वास थांबल्यामुळे हृदय काम करणे बंद करते, तेव्हा वापरली जाते. सीपीआरचा उद्देश वैद्यकीय मदत मिळेपर्यंत शरीरातील रक्त आणि ऑक्सिजनचा प्रवाह, विशेषत: मेंदूपर्यंत, चालू ठेवणे हा आहे, जेणेकरून मेंदूचे कार्य टिकून राहते आणि जीव वाचण्यास मदत होते. याबाबतची जनजागृती अनब प्रशिक्षण विठ्ठल हॉस्पिटलच्या माध्यमातून दिले जात आहे.

# देहू-आळंदी रस्त्यावर धूळ अन खड्डे प्रशासनाचे दुर्लक्ष

## नागरिकांच्या डोळ्यांना अन हाडांना त्रास

**मोशी**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

देहू-आळंदी रस्त्यावर मोई फाट्यापासून पुढे खड्डे अनब प्रचंड धूळ असल्याने वाहनचालकांना प्रचंड त्रास तसेच अपघाताची भिती निर्माण झाली आहे. लवकरात-लवकर हा रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी नागरिकांकडून, वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.




मोई फाट्यावर अवजड वाहने, सिमेंटने भरलेल्या ट्रेल जातात. त्यावेळी सिमेंट खाली सांडले जाते. तसेच रस्ताही उखडल्याने त्याची धूळ त्यामुळे वाहनचालकांना गाडी चालवताना नकोसे होते. या ठिकाणाहून जाताना चेहरा पूर्ण धूळीने माखला जातो. तर डोळ्यामध्ये धुळीचे कण गेल्यामुळे डोळ्यांना जळजळ, डोळे लाल होणे अशा समस्यांचा सामना करावा लागतो आहे. तसेच रस्ता उखडल्यामुळे अपघाची भितीही वाहनचालकांना सतावते आहे.

> “अमृत योजने अंतर्गत तळवडे पासून ते चऱ्होली पर्यंत पाण्याच्या लाईनचे काम सुरु आहे. रस्त्यावरील काही पॅच भरले आहे. मात्र त्या लाईनची टेस्टींग राहील्यामुळे रस्त्याचे कामकाज रखडलेले आहे. पाणीपुरवठा विभागाचे कामकाज पूर्ण होताच रस्त्याचे काम सुरु करणार आहोत.
>
> **- बापू गायकवाड,** सहशहर अभियंता

> “देहू-आळंदी मोई फाट्यापासून पुढे उखडलेला रस्ता अनब धुळीने वाहनचालक त्रस्त झाले आहेत. या ठिकाणी किरकोळ अपघातही झाले आहेत. प्रशासनाने लक्ष देऊन लवकरात-लवकर रहदारीचा रस्ता दुरुस्त करणे आवश्यक आहे. पाणीपुरवठा अनब बीआरटीएस विभागाने समन्वय साधून काम तत्काळ पूर्ण करावे.
>
> **-अश्विनी जाधव,** मा.नगरसेविका

> “सकाळच्या वेळी मुलांना शाळेत सोडवताना, नागरिकांना कामावर जाताना या रस्त्यावरून जावे लागते. धुळीने चेहरा अनब डोळ्याची वाट लागते. प्रशासनाला वारंवार याबाबत बोलने झाले. हे काम प्राधान्याने तत्काळ पूर्ण होणे आवश्यक आहे. प्रशासनाने टोलवाटोलवी न करता समन्वयातून कामकाज पूर्ण करावे.
>
> **-प्रदीप आहेर,** (ग्रामस्थ)

# डीजे, लेझर लाईटचा वापर करणाऱ्या ४० मंडळांवर कारवाई; वाकडमध्ये सर्वाधिक १७ मंडळांना झटका

## शिक्षण विश्व:आर्टिफिशियल इंटेलिजन्सबाबत शिक्षकांना डॉ. शैलेश गुजर यांच्याकडून मार्गदर्शन

**पिंपरी।**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

नुकत्याच पार पडलेल्या विसर्जन मिरवणुकीत लेझर बीम लाईट आणि डीजेचा वापर करणाऱ्या ४० मंडळांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. भारतीय न्याय संहिता कलम २२३ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये वाकड पोलिस ठाणे क्षेत्रात १७, पिंपरी ८, निगडी ५, सांगवी ५, दापोडी ३ आणि तळेगाव दाभाडे २ अशा एकूण ४० मंडळांवर कारवाई करण्यात आल्याची पोलिस दप्तरी नोंद आहे.



### नॉईज लेवल मीटरचा वापर

गणेशमूर्ती विसर्जन मिरवणुकांदरम्यान डीजे व लेझर बीम लाईटसह कर्णकर्कश्य आवाज करणाऱ्या यंत्रणांवर पोलिसांनी विशेष लक्ष ठेवले होते. नॉईज लेवल मीटरद्वारे विविध ठिकाणी आवाजाची पातळी तपासण्यात आली. मर्यादेपेक्षा जास्त आवाज झालेल्या प्रकरणात संबंधित मंडळांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

सहायक पोलिस आयुक्तांकडून या प्रकरणांची प्राथमिक चौकशी सुरू असून, पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी यापूर्वीच डीजे व लेझर बीमच्या वापरावर कठोर बंदी घालून मनाई आदेश जारी केले होते. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश सर्व पोलिस ठाण्यांना देण्यात आले होते. त्यानुसार, संपूर्ण आयुक्तालय हद्दीत मोठ्या प्रमाणावर तपासणी करून ४० मंडळांवर कारवाई करण्यात आली आहे.

### गुन्हे दाखल झालेली पाच प्रमुख मंडळे

१) आकुर्डीतील शिवाजी मित्र मंडळाच्या मिरवणुकीत डीजे व लेझर बीमचा वापर झाला. याबाबत मंडळ अध्यक्ष सुरज मारुती पिंजण यांच्यासह डीजे चालक-मालक, ट्रॅक्टर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला.

> “गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तसेच ध्वनिप्रदूषण नियंत्रणासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले होते. या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्याने एकूण ४० मंडळांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलमानुसार कारवाई करण्यात आली आहे.
>
> **-डॉ. विशाल गायकवाड,** पोलिस उपायुक्त, परिमंडळ दोन, पिंपरी- चिंचवड

२) सुदर्शन मित्र मंडळ, आकुर्डी येथे डीजेचा आवाज मर्यादेपेक्षा जास्त आढळल्याने अध्यक्ष आदित्य सुनील शिंदे, डीजे मालक क्षितिज शहा व बीम लाईट मालक सिद्धांत यादव यांच्यावर कारवाई करण्यात आली.

३) भोसरीतील दिघीरोड मंडळाच्या मिरवणुकीत अध्यक्ष प्रथमेश गवळी, उपाध्यक्ष आकाश गवळी, डीजे मालक अर्जुन पवार आणि ट्रॅक्टर चालक हेमला चव्हाण यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

४) भोसरीतील लोंढे आळी मंडळाच्या अध्यक्ष आर्यन सपकाळ, डीजे मालक प्रवीण सावंत, ट्रॅक्टर चालक गोपाळ राठोड यांच्यावर ध्वनी प्रदूषण प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.